# <u>पात्रतेच्या अटी</u>

१) यापूर्वी ज्या गिरणी कामगार / वारस यांनी सारस्वत बँक किंवा अँक्सिस बँकेत अर्ज सादर केलेले आहेत व त्या अर्जांची नोंद म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे, अशा गिरणी कामगार / वारस यांना नव्याने अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही.

२) मयत गिरणी कामगाराला एकापेक्षा जास्त वारस (अपत्य) असल्यास व एकापेक्षा जास्त वारसांनी अर्ज सादर केल्यास मुळ गिरणी कामगारांच्या नावाने सोडत काढुन सर्व वारसांनी केलेल्या अर्जाचा एकत्रितरित्या विचार करण्यात येईल. तसेच यापूर्वी सुध्दा एकापेक्षा जास्त वारसांनी अर्ज सादर केल्याचे आढळुन आल्यास अशा प्रकरणी सुध्दा वरील प्रमाणे पध्दत अंमलात आणण्यात येईल.

३) ऑनलाईन अर्ज सादर करण्यापूर्वी अर्जदारास रु.१५०/- (प्रशासकीय खर्च)(विनापरतावा) म्हणुन मंडळाने नियुक्त केलेल्या कोटक महिंद्रा बँकेत ऑनलाईन भरणा करणे अनिवार्य राहील.

४) गिरण्यांच्या जमिनीवरील गिरण्यांच्या चाळीत ज्या गिरणी कामगार / वारस यांना गिरणीमार्फत घराचे वितरण करण्यात आलेले आहेत, अशा गिरणी कामगार / वारस यांनी ऑनलाईन अर्ज सादर करु नये.

५) गिरणी कामगार दि.०१/०१/१९८२ वा त्यानंतर गिरणीच्या नियमित आस्थापनेवर कमीत कमी एकुण २४० दिवस अखंडीत (Deemed कायम) सेवा केलेली असली पाहीजे.

६) गिरणी कामगारांचे ओळख / अस्तित्व ठरविण्यासाठी पुढील ५ पैकी १ निकष (बाब) पुर्ण करणे आवश्यक राहील. (अ) मुळ टिकीट क्रमांक व पी.एफ.(P.F) क्रमांक (ब) मुळ टिकीट क्रमांक व ईएसआयसी (ESIC) क्रमांक (क) वरील अ व ब बाबतचा पुरावा नसल्यास गिरणी व्यवस्थापकाकडुन प्राप्त झालेले प्रमाणपत्र (ड) लाल पास (इ) आय कार्ड / सर्व्हिस सर्टिफिकेट. (सदर पुराव्यापैकी किमान एका पुराव्याची नोंद ऑनलाईन अर्जामध्ये करणे अनिवार्य आहे.)

७) अर्जदाराने ओळखपत्र म्हणुन आधार कार्ड किंवा पॅन कार्ड यांचा क्रमांक अर्जात नमुद करावा.

८) आजमितीस सुरु असलेला भ्रमनध्वनी (मोबाईल) क्रमांक अर्जात नमुद करणे अनिवार्य राहील.